## :: सौदाचिठ्ठी ::

| | | |
|---|---|---|
| **लिहून देणार** | : | **श्री. अरुण पि. हनुमंत इंगेवाड**<br>वय ३४ वर्षे, धंदा : शेती व व्यापार<br>रा. वाघाळा, ता.जि.नांदेड<br>(Aadhar No.5430 8322 9227) |
| **लिहून घेणार** | : | **कु. सुजया पि. अशोकराव चव्हाण**<br>वय ३२ वर्षे, धंदा : शेती व व्यापार<br>रा. शिवाजी नगर, नांदेड<br>(Aadhar No.4707 9992 5901) |

कारणे सौदाचिठ्ठी लिहून देतो ऐसा जे की,

मौजे बाबापुर, ता. अर्धापुर, जि. नांदेड येथील शेत गट क्र. ३०, एकुण क्षेत्रफळ ०१ हेक्टर ८४ आर, आकार ०८ रुपये ०८ पैसे पैकी ०० हेक्टर ४८ आर जमीन माझ्या

वडीलांनी नोंदणीकृत विक्रीखत क्र. १७५ दि. १९.०१.१९९५ आधारे विकत घेतली आहे. सदरील जमीनीचा भाग राज्यमार्ग मध्ये संपादित झाला आहे व शिल्लक ०० हेक्टर ३६.९३ आर जमीन आहे. सदरील जमीन ही अकृषिक झालेली असून त्याचा अकृषिक परवाना क्र. १९९२/एल.एन.डी./ बी/एन.ए./सिआर-०१ दि. ०३.०३.१९९५, उपजिल्हाधिकारी, नांदेड असा आहे. ज्याचे वर्णन खाली दिल्याप्रमाणे आहे, ती जमीन आज रोजी मी लिहून घेणार यांना एकूण किंमत रूपये ४०,००,०००/- (अक्षरी रूपये चाळीस लाख फक्त) ला कायमची विक्री करण्याचा करार केला आहे व करारावर आज रोजी मला लिहून घेणार यांच्याकडून स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा नवीन मोंढा, नांदेड चा धनादेश क्र. ३५२९२३ दि. ०२.०८.२०२४ आधारे रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) प्राप्त झाले आहेत.

सदरील सौद्याची उर्वरित रक्कम रूपये ३५,००,०००/- (अक्षरी रूपये पस्तीस लाख फक्त) विक्रीखतावर किंवा त्यापुर्वी घेण्याचे ठरले आहे.

लिहुन देणार हे आदिवासी आहेत व सदरील जमीन विक्री करण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडुन विक्रीची परवानगी काढण्याचे ठरले आहे व विक्री परवानगी मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत उर्वरित रक्कम घेवून विक्रीखत करून देण्याचे ठरले आहे.

सदरील जमीन मी यापूर्वी कोणासही विक्री केलेली नाही, बक्षीस दिलेले नाही, विक्री करण्याचा करार केलेला नाही, गहाण ठेवलेली नाही, किंवा कोणा बरोबरही कसल्याही प्रकारचा व्यवहार/करार केलेला नाही व तसे काहीही निघाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी लिहून देणार यांच्यावर राहील.

सदरील जमिन संबंधी कोणत्याही न्यायालयामध्ये कसल्याही प्रकारचा वाद प्रलंबित नाही व तसे काही निघाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी लिहून देणार यांच्यावर राहील.

सदरील जमिनीमध्ये माझ्याशिवाय ईतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क संबंध नाही व तसे कांही निघाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी लिहून देणार यांच्यावर राहील.

सदरील जमीन यापूर्वी कोणत्याही कारणासाठी संपादीत करण्यात आलेली नाही किंवा कोणत्याही कारणासाठी आरक्षीत करण्यात आलेली नाही व तसे काही निघाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर राहील.

सदरील जमीन ही इनामी नाही किंवा सदरील जमीनीवर कोणाचाही कुळ नाही व तसे काही निघाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर राहील.

सदरील जमीन मी माझी उर्वरित जमीन विकसित करण्याकरिता व व्यापाराच्या उन्नतीकरिता म्हणून लिहून घेणार यांना विक्री करण्याचे ठरविले आहे.

लिहुन घेणार हे जाहीर प्रगटन देवून आक्षेप मागवु शकतील. कोणाचा काही आक्षेप आल्यास लिहुन देणार हे स्वत:च्या खर्चाने विक्रीखतापुर्वी मिटवुन देण्याचे ठरले आहे.

**:: जमीनीचे वर्णन ::**

मौजे बाबापुर, ता. अर्धापुर, जि. नांदेड येथील शेत गट क्र. ३०, एकुण क्षेत्रफळ ०१ हेक्टर ८४ आर, आकार ०८ रुपये ०८ पैसे पैकी ०० हेक्टर ३६.९३ आर जमीन, ज्याची चतु:सिमा :-

पूर्वेस - नांदेड-अर्धापुर मुख्य रस्ता
पश्चिमेस - कॅनॉल
उत्तरेस - दिगंबर देशमुख यांचे शेत
दक्षिणेस - नागोराव देशमुख यांच्या शेत

करिता ही सौदाचिठ्ठी लिहून दिली जी खरी असून आम्हाला मान्य आहे.

दिनांक : ०२/०८/२०२४

**साक्षीदार** | **लिहून देणार**

१.बालाजी पि.विठ्ठलराव जाधव
रा. पद्मजा सिटी, नांदेड

**अरुण पि. हनुमंत इंगेवाड**
रा. वाघाळा,ता.जि.नांदेड

२. संजय रामजी इंगेवाड
   रा. वाघाळा, नांदेड

दि.०६.०८.२०२४

प्रति,

मा. अप्पर जिल्हाधिकारी साहेब,

नांदेड

विषय :- आदिवासी ची जमीन विकत घेण्याकरिता परवानगी मिळणे बाबत.

महोदय,

**शपथपत्र**

मी सुजया पि. अशोकराव चव्हाण वय ३२ वर्षे, धंदा : व्यापार व शेती रा. शिवाजीनगर, नांदेड शपथेवर निवेदन करते की,

मी श्री अरूण पि. हनुमंत इंगेवाड यांच्याकडून मौजे बाबापुर ता. अर्धापूर जि. नांदेड येथील शेत गट क्र.३० एकूण क्षेत्रफळ ०१ हेक्टर ८४ आर, आकार रूपये ८.०८ पैसे पैकी ०० हेक्टर ३६.९३ आर जमीन पूर्ण जी अकृषिक झालेली आहे ती वाणिज्य वापराकरिता मी विकत घेण्याचा करार केला आहे. सदरील जमीनीचा उपभोग मी वार्णिज्य वापराकरिता करणार आहे.

करिता हे शपथपत्र.

दि.०६.०८.२०२४

**शपथ घेणार,**

**सुजया पि. अशोकराव चव्हाण**
रा. शिवाजीनगर, नांदेड

**पडताळणी**

मी सुजया पि. अशोकराव चव्हाण वय ३२ वर्षे, धंदा : व्यापार व शेती रा. शिवाजीनगर, नांदेड शपथेवर प्रतिज्ञा करते की, सदरील शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिले आहे, जे बरोबर असून मला मान्य आहे, करिता ही पडताळणी.

**सुजया पि. अशोकराव चव्हाण**
रा. शिवाजीनगर, नांदेड

दि.०६.०८.२०२४

प्रति,

मा. अप्पर जिल्हाधिकारी साहेब,

नांदेड

विषय :- आदिवासी ची जमीन विकत घेण्याकरिता परवानगी मिळणे बाबत.

महोदय,

**<u>शपथपत्र</u>**

मी सुजया पि. अशोकराव चव्हाण वय ३२ वर्षे, धंदा : व्यापार व शेती रा. शिवाजीनगर, नांदेड शपथेवर निवेदन करते की,

माझ्या नावाने शेती असून मी श्री अरूण पि. हनुमंत इंगेवाड यांच्याकडून मौजे बाबापुर ता. अर्धापूर जि. नांदेड येथील शेत गट क्र.३० एकूण क्षेत्रफळ ०१ हेक्टर ८४ आर, आकार रूपये ८.०८ पैसे पैकी ०० हेक्टर ३६.९३ आर अकृषिक जमीन विकत घेतल्यानंतर माझ्या जमीनीची होल्डींग क्षेत्र सिलींग कायद्या अंतर्गत अतिरिक्त होत नाही.

करिता हे शपथपत्र.

दि.०६.०८.२०२४

शपथ घेणार,

**सुजया पि. अशोकराव चव्हाण**
रा. शिवाजीनगर, नांदेड

**<u>पडताळणी</u>**

मी सुजया पि. अशोकराव चव्हाण वय ३२ वर्षे, धंदा : व्यापार व शेती रा. शिवाजीनगर, नांदेड शपथेवर प्रतिज्ञा करते की, सदरील शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिले आहे, जे बरोबर असून मला मान्य आहे, करिता ही पडताळणी.

**सुजया पि. अशोकराव चव्हाण**
रा. शिवाजीनगर, नांदेड

दि.___.०७.२०२४

प्रति,

मा. अप्पर जिल्हाधिकारी साहेब,

नांदेड

विषय :- आदिवासी ची जमीन विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

महोदय,

मी मौजे बाबापुर ता. अर्धापूर जि. नांदेड येथील शेत गट क्र.३० एकूण क्षेत्रफळ ०१ हेक्टर ८४ आर, आकार रूपये ८.०८ पैसे पैकी ०० हेक्टर ३६.९३ आर अकृषिक जमीनीचा मालक आहे. सदरची जमीन ही अकृषिक झालेली असून त्याचा अकृषिक परवानागी क्र.१९९२/एल.एन.डी/II/एन.ए./सीआर-१ दि.०३.०३.१९९५ उप जिल्हाधिकारी, नांदेड असा आहे. सदरील जमीन माझ्या वडीलांनी नोंदणीकृत विक्रीखत क्र.१७५ दि.१९.०१.१९९५ आधारे विकत घेतलेली आहे व माझ्या वडीलांनी करून दिलेल्या मृत्युपत्रा आधारे सदरची जमीन माझ्या मालकी आहे.

मी आदिवासी आहे व माझी जात मन्नरवारलू -२७ असे आहे व मा. उप जिल्हाधिकारी, नांदेड यांनी माझ्या हक्कामध्ये जात प्रमाणपत्र परिशिष्ठ -ब दिले आहे, ज्याचा क्र.२००२/ए/कास्ट सर्टिफिकेट/तालुका नांदेड सीआर-५८ असा आहे.

सदरील जमीनीतून मला पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही व सदरील जमीन विकून मी माझी दुसरी जमीन विकसीत करण्याकरिता व माझ्या व्यापाराच्या उन्नतीकरिता पैसे लागत असल्यामुळे विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरील जमीन मी कु. सुजया पि. अशोकराव चव्हाण यांना विक्री करायचे ठरविले आहे.

तरी आपणांस विनंती की, सदरील जमीन विक्री करण्याकरिता मला परवानगी द्यावी.

**अर्जदार,**

**अरूण पि. हनुमंत इंगेवाड**

रा. वाघाळा, नांदेड